# शिक्षण विभाग (प्राथमिक)
# जिल्हा परिषद रत्नागिरी

**योजनेचे नाव:- रत्नागिरी जिल्हा परिषद अखत्यारीतील प्राथमिक शाळांतील इ. ५वी ते ७ वी च्या विज्ञान विषयात रस व संशोधनाची आवड चअसणाऱ्या विद्यार्थ्यांची ISRO व NASA अंतराळ संशोधन संस्थेस भेट घडवून आणणे.**

**कार्यान्वित करणाऱ्या यंत्रणेचे नाव:- शिक्षण विभाग (प्राथमिक), जिल्हा परिषद, रत्नागिरी**

**योजनेची सर्वसाधारण माहिती व प्रस्तावना:-**

आपल्या देशातील केंद्रीय मनुष्यबळ विकास मंत्रालयाच्या नविन अहवालानुसार महाराष्ट्राचा शैक्षणिक दृष्ट्या चौथा क्रमांक आहे. निश्चितच ही चांगली कामगिरी आहे. महाराष्ट्रात प्राथमिक शिक्षण क्षेत्रात रत्नागिरी जिल्हा अव्वल स्थानावर आहे. जिल्हा परिषद रत्नागिरी अंतर्गत प्राथमिक शाळांमधील उच्च गुणवत्ताधारक विद्यार्थ्यांच्या सर्वंकष विकासाच्या दृष्टीने विज्ञानाचे महत्व, विज्ञानविषयक आवड निर्माण व्हावी तसेच त्यांच्यामध्ये वैज्ञानिक दृष्टीकोन विकसित करणे या बाबतीत रत्नागिरी जिल्हा परिषद व प्रशासन नेहमीच तत्पर असते.

जिल्हा परिषद शाळा ह्या ग्रामिण भागात असल्यामुळे साहजिकच नवनवीन तंत्रज्ञान व प्रवाहांपासून थोड्याशा लांब असतात.जि.प. शाळांमधील विद्यार्थी मात्र गुणवत्तावान आहेत हे आतापर्यंतची शिषवृत्ती परीक्षा निकाल व नवोदय परीक्षा निकाल आणि राष्ट्रीय स्तरावर होणारा राष्ट्रीय संपादणुक सर्व्हे या मधुन सिद्ध झाले आहे. आपला जिल्हा नेहमीच पहिल्या तीन क्रमांकावर असतो. रत्नागिरी जिल्ह्याला भौगोलिक मर्यादा असल्या तरी आतापर्यंच्या आपल्या जिल्ह्यात खूप मोठे विद्वान होवून गेलेले आहेत. रत्नागिरीचा इतिहास हा गौरवशाली असून अनेक रत्नांनी गाजविलेला आहे.याचाच विचार करून भविष्यातही जि.प. शाळांतील मुले शास्त्रज्ञ व्हावेत तसेच त्यांच्यात विज्ञानाची आवड निर्माण व्हावी यासाठी प्रयत्न होणे आवश्यक आहे. या अनुषंगाने ISRO या भारतीय अंतराळ संशोधन संस्थेस तसेच त्रिवेंद्रम येथे संग्रहालयास व NASA,अमेरिका अंतराळ संशोधन संस्थेस तसेच SMITHSONIAN संग्रहालय व इतर वैज्ञानिकदृष्ट्या महत्वाच्या स्थळांना जिल्हा परिषद शाळांतील विद्यार्थ्यांना भेट देवून येथील संस्थेची कार्यपद्धती व त्यांची परिपूर्ण माहिती घेवून त्यांना

अंतराळ संशोधन बाबत जिज्ञासा निर्माण करणे व भविष्यात अशा विद्यार्थ्यांमधून शास्त्रज्ञ घडविण्याच्या उद्देशाने विद्यार्थ्यांना प्रेरित करणे यासाठी प्रत्यक्ष भेटीचे नियोजन आहे.जेणेकरून रत्नागिरी जिल्ह्याच्या भौगोलिक दृष्टया विचार करता सोयासुविधांचा अभाव व विद्यार्थ्यांची आर्थिक परिस्थिती यामुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना देखील विज्ञान तंत्रज्ञान याबाबत माहितीपासून वंचित रहावे लागते. याकरिता विद्यार्थी हिताच्या दृष्टीने जागतिक स्तरावरील उच्च दर्जाच्या संशोधन संस्थाना भेट देण्याचा अनुभव विद्यार्थ्यांना घेता येईल. सदर भेट विद्यार्थ्यांच्या जीवनामधे आमुलाग्र बदल घडवेल हे निश्चित.

या योजनेत जिल्हा परिषद ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास जागृत होवून त्यांच्यामध्ये संशोधक व चिकित्सक वृत्ती वाढेल. यामुळे जिल्हा परिषद शाळांकडे पालकांचा पाहण्याचा दृष्टीकोन व मुलांचा प्रवेश घेण्याकडे सुद्धा कल वाढेल व शाळांविषयी आवड निर्माण होईल. तसेच संशोधनाच्या क्षेत्राकडे देखील मुलांचा कल वाढेल.

-------XXXX--------